C:\Documents and Settings\Administrator\Desktop\Copy of Bharati-2.doc

## मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांचे कार्यालय स्वारगेट, जुनी पी एम टी इमारत, पुणे - ४११ ०३७.

गोपनीय

विषय - गट क व ड संवर्गातील रिक्त पदे सरळसेवेने भरणेबाबत. पुणे येथील भरती प्रक्रियेत झालेल्या गैरव्यवहाराबाबत..

क्र.कक्ष-२-क/आस्था/२२/प्र.क्र. /७६८ /२०१०.११.
पुणे - ४११ ०३७, दिनांक ११/०८/२०१०.

प्रति,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(मानव संसाधन व्यवस्थापन व प्रशासन)
म.रा. नागपूर.

संदर्भ -१. आपले गोपनीय पत्र क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.३५/१०-११/२२९/१०-११, दिनांक २४.०५.२०१०.
२. वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-४/आस्था/भरती/चौकशी/६९१-अ/१०-११, दिनांक ११.०७.२०१०.

जिल्हास्तरीय क संवर्गाची पदे जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीमार्फत सरळसेवेने भरणेकामी शासन निर्णय क्रमांक २००७ प्र.क्र.४७/०७/१३ अ/ दिनांक २७.०६.२००८ व सम क्रमांकाचे दिनांक १९.१०.२००७ चे निर्णयानुसार सुचना प्राप्त झालेल्या होत्या. पुणे जिल्हयामध्ये जुन्नर,भोर व पुणे हे ३ वनविभाग येतात. त्यामुळे पुणे जिल्हयातील क संवर्गाची पदे भरणेसाठी सेवेने जेष्ठ असलेचे वनसंरक्षक पुणे यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-२-क/४४२५, दिनांक २०.०२.२००९ व क्रमांक कक्ष-२-क/३५७, दिनांक ०८.०५.२००९ अन्वये आवश्यक ते मागणीपत्र जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविणेबाबत लेखी सुचना देण्यात आलेल्या होत्या. व सोबत उपरोक्त शासन निर्णय दिनांक १९.१०.२००७ व २७.०६.२००८ चे सहपत्रीत करणेत आले होते . त्यामुळे सदरची भरती प्रक्रिया ~~वनसंरक्षक पुणे यांचे मार्फत~~ जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खाली वनसंरक्षक पुणे यांचे मार्फत पुर्ण करणेत आलेली असून पद भरतीसाठी प्राथमिक स्वरुपाची माहिती वनसंरक्षक पुणे यांना या कार्यालयाकडून ~~[illegible]~~ पुरविण्यात आलेली होती. त्यामुळे भरती प्रक्रियेची कार्यवाही जिल्हाधिकारी पुणे आणि वनसंरक्षक पुणे यांचे नियंत्रणाखाली पार पडली आहे.

उपरोक्त संदर्भिय पत्र क्रमांक १ च्या अनुषंगाने विषयांकित मुद्यांची माहिती (१ ते १६) वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांचेकडून प्राप्त झालेली आहे. (सहपत्र) सदरील माहितीमध्ये त्यांनी १ ते १६ मुद्यांबाबत विश्लेषणात्मक स्पष्टीकरण सादर केलेले आहे सदरील स्पष्टीकरणावर या कार्यालयाचे पुढील प्रमाणे अभिप्राय सादर करण्यात येत आहे.

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

<u>उपस्थित मुद्या क्रमांक - १ :</u> वनसंरक्षक पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र.कक्ष-४/आस्था/३३१, दिनांक ९/७/२००९ अन्वये त्यांचे पत्र दिनांक ११/६/२००९ अन्वये पाठविलेले मागणीपत्र सुधारीत करुन गट 'क' संवर्गातील पदे भरण्यासाठी मागणीपत्र जिल्हाधिकारी पुणे यांचेकडे पाठविले असल्याचे दिसुन येते. परंतु सदर पत्रामध्ये आरक्षणाकरिता नमुद केलेल्या पदांच्या संख्येमध्ये तसेच लिपीक करिता एकुण संख्येमध्ये खोडुन बदल करुन हाताने बाजुला सुधारीत संख्या लिहील्याचे दिसुन येते. सदर पदांच्या संख्यामध्ये बदल करण्याची आवश्यकता का भासली त्याबाबत वनसंरक्षक पुणे यांचेकडून खुलासा प्राप्त करुन आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

<u>वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :</u> जिल्हाधिकारी पुणे यांना गट क व ड ची पदे भरणेबाबतचे मागणीपत्र २११ दिनांक ११/६/०९ (सहपत्र १) अन्वये पाठविले होते व या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४/आस्था/३३१, दिनांक ९/७/२००९ चे पत्र फक्त गट क ची पदे भरणेबाबत सादर केले आहे. सदरच्या पदामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाने समक्ष दिलेल्या सूचनांनुसार व या कार्यालयाचे क्रमांक ३७८ दिनांक २०/७/०९ अन्वये बिंदु नामावली वत्त स्तरावर एकत्र करुन रिक्त होणारी पदे विचारात घेऊन मुख्य वनसंरक्षक प्रा. पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक १५८० दिनांक ३१/७/२००९ (सहपत्र- २) अन्वये मागणीपत्रात सुधारणा केली आहे. मुख्य वनसंरक्षक यांनी दिलेल्या सुधारीत आरक्षणाप्रमाणे जिल्हाधिकारी पुणे यांचे कार्यालयांत समक्ष जाऊन या कार्यालयाने ११/६/०९ अन्वये पाठविलेल्या मूळ पत्रात सुधारणा करुन तशी सुधारणा कार्यालयाच्या स्थळ प्रतीतील आकडयांना गोल करुन केलेली आहे. सोबत मुख्य वनसंरक्षक प्रा. पुणे यांचेकडील ३१/७/०९ च्या पत्राची छायांकित प्रत सहपत्रित करण्यात येत आहे. तरी नियमानुसार केलेली खाडाखोड व सुधारीत आकडेवारी योग्य व बरोबर असल्याने जिल्हाधिकारी यांनी त्यास मान्यता दिली असल्याने (सहपत्र-३) खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

<u>अभिप्राय -</u> मुद्या क्रमांक १ अन्वये उपरोक्त नमुद केलेले विश्लेषण संयुक्तीक असून त्यास हे कार्यालय सहमत आहे.

<u>उपस्थित मुद्या क्रमांक - २ :</u> जिल्हाधिकारी पुणे यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक पमई/२२६६/दोन, दिनांक १७/८/२००९ अन्वये वनरक्षक ५९ पदे लिपीक १८ पदे, वाहनचालक २ पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्यासाठी जाहिरातीस मान्यता दिली. परंतु सदर पत्रांत भरावयाच्या एकुण पदासोबत सामाजिक

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

आरक्षणासोबत समांतर आरक्षणा अंतर्गत भरावयाच्या पदांच्या संख्येबाबतचा उल्लेख करण्यांत आलेला नाही. याबाबत वनसंरक्षक, पुणे यांचेकडून खुलासा प्राप्त करुन आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

**वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :** विषयांकित प्रकरणी या कार्यालयाकडून दिनांक ३१/७/०९ नंतर जिल्हाधिकारी कार्यालयांत समक्ष जावून या कार्यालयाने दिलेल्या दिनांक ११/६/०९ चे पत्रात दुरुस्ती करुन दिल्याप्रमाणे भरावयाच्या एकूण पदांस जिल्हाधिकारी पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक पमई/२२६६/दोन, दिनांक १७/८/२००९ अन्वये मंजूरी दिली आहे. तसेच जाहिरातीचे प्रारुपही मंजूर केले आहे. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे पत्रात या कार्यालयाच्या दि.११/६/०९ चे पत्राचा संदर्भ नमूद केला असून सदरची पदे समांतर व सामाजिक आरक्षण मुख्य वनसंरक्षक प्रा. पुणे यांचेकडील १५८० दिनांक ३१/७/२००९ प्रमाणेच आहे. कृपया अवलोकन होणेस विनंती आहे. सोबत दिनांक २१/८/०९ ची जाहिरात जोडली आहे. (सहपत्र- ४) जाहीराती मध्ये समांतर आरक्षण नमूद असल्याने खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**अभिप्राय -** मुद्या क्रमांक २ बाबत वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी जिल्हाधिकारी यांचे पत्रात दिनांक ११.०६.२००९ चे पत्राचा उल्लेख केला असे म्हटले आहे तथापि दिनांक ११.०६.२००९ चे पत्रांचा उल्लेख नसून दिनांक ०९.०७.२००९ चे पत्राचा उल्लेख आहे सदर दिनांक ०९.०७.२००९ चे पत्रात दिनांक ११.०६.२००९ अन्वये पाठविलेल्या मागणीपत्रात सुधारणा करीत असलेबाबत उल्लेख आहे. केलेले विश्लेषण योग्य असून त्यास हे कार्यालय सहमत आहे.

**उपस्थित मुद्या क्रमांक - ३ :** आपलेकडील पत्र क्र.कक्ष-२-क/आस्था/१५८०, दि.३१/७/२००९ अन्वये समांतर आरक्षणा अंतर्गतची तसेच अनुशेषाबाबतची आवश्यक माहिती वनसंरक्षक पुणे यांना उपलब्ध करुन दिलेली असल्याचे दिसुन येते. समांतर आरक्षणा अंतर्गत अति उच्च गुणवत्ता धारक खेळाडुसाठी सुध्दा ५ % राखीव जागा ठेवण्यांत येतात परंतु सदर समांतर आरक्षणा अंतर्गत अति उच्च गुणवत्ता धारक खेळाडुसांठी आरक्षण ठेवण्यांत आल्याचे आपले सदर पत्रावरुन दिसुन येत नाही. याबाबत आपला खुलासा आपले अभिप्रायासह सादर करावा

उपरोक्त नमुद मुद्या हा या कार्यालयाशी निगडीत असल्याने पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

या कार्यालयाकडील पत्र क्र.कक्ष-२-क/आस्था/१५८०, दि.३१/७/२००९ अन्वये समांतर आरक्षणा अंतर्गतची तसेच अनुशेषाबाबतची आवश्यक माहिती वनसंरक्षक पुणे यांना उपलब्ध करुन दिलेली होती.

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

सनांतर आरक्षणा अंतर्गत अति उच्च गुणवत्ता धारक खेळाडुसांठी ५ टक्के आरक्षण या कार्यालयाकडून अनावधाने राहुन गेलेली आहे. ~~ही वस्तुस्थिती आहे,~~ ही वस्तुस्थिती असली तरी या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-२-क/आस्था/४४०८, दि.२०/०२/२००९ अन्वये भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी वनसंरक्षक पुणे यांना सुचित करण्यात आले होते व सदर पत्रासोबत दिनांक १९.१०.२००७ व २७.०६.२००८ चे शासन निर्णयाच्या प्रती पाठवुन भरती प्रक्रियेची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचे सहमतीने पार पाडण्याविषयी सुचना देण्यात आल्या होत्या. तसेच जिल्हाधिकारी यांनी सदरचे जाहिरातीच्या नमुन्यास त्यांचेकडील पत्र क्र.पमई/२२६६/दोन, दिनांक १७/८/२००९ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे मंजूरी देते वेळेही ही बाब त्यांचे निदर्शनास आली नसल्याचे दिसून येते. भरती प्रक्रिया वनसंरक्षक पुणे यांचेमार्फत जिल्हाधिकारी पुणे यांचे अध्यक्षतेखाली चालु असल्याने ही बाब या कार्यालयाच्या निदर्शनास यानंतरही आली नाही. त्यामुळे सदरचा ५ टक्के आरक्षणाचा मुद्या जाणीवपुर्वक वगळण्यात आलेला नाही ही वस्तुंस्थिती आपले निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

<u>उपस्थित मुद्या क्रमांक - ४ :</u> रिक्त पदे भरण्यापुर्वी बिंदु नामावली नोंदवही प्रमाणित करुन घेण्यांत आली किंवा नाही याबाबत काहीही कळुन येत नाही. रिक्त असलेली पदे सरळसेवेने भरण्यापुर्वी बिंदु नामावली नोंदवही आयुक्त मागासवर्गीय कक्षाकडुन प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे. याबाबत आपले खुलासा अभिप्रायासह प्रमाणित केलेली बिंदुनामावलीची प्रतीसह या कार्यालयास सादर करावी.

उपरोक्त नमुद मुद्या हा या कार्यालयाशी निगडीत असल्याने पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र बीसीसी/२००९ / प्र.क्र. २९१ /०९ /१६-ब दिनांक ५/११/२००९ अन्वये बिंदु नामावलीस सहाययक आयुक्त (मा व क) यांची अंतिम मान्यता असल्याशिवाय नियुक्ती देण्यात येऊ नये असे नमुद आहे, तथापि जर काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये अशी मान्यता घेणे शक्य नसल्यांस अशी बिंदु नामावली ६ महिन्यांचे आत सहा. आयुक्त,(मा व क ) यांची अंतिम मान्यता आवश्यक राहील अशा सूचना आहेत . पूर्वी विभागीय स्तरावर क संवर्गातील पदे भरली जात होती. त्यानंतर सदरची पदे वृत्त स्तरावर भरली जाऊ लागली. आणि सन २००८.०९ पासून सदरची पदे पुन्हा विभागीय स्तरावर भरण्यात येत आहेत. तथापि, विभागीय स्तरावरील २००३ पर्यंतची बिंदु नामावली एकत्रित करुन वनसंरक्षक पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ३७८, दिनांक २०.०७.२००९ अन्वये भरती करावयाच्या पदाचे आरक्षणाचा अनुशेष दर्शवुन या कार्यालयांचे पत्र क्रमांक ३५७, दिनांक ०८.०५.२००९ प्रमाणे आरक्षित पदाचा वृत्त स्तरावर ताळमेळ घेतल्याशिवाय जाहिरात देणेस प्रशासकीय अडचणी निर्माण होतील असे कळविले. त्याप्रमाणे

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

सद्यस्थितीत कार्यरत असलेल्या कर्मचारी यांची माहिती विचारात घेऊन तयार केलेला अनुशेषाप्रमाणे आरक्षणाबाबत सुधारीत माहिती या कार्यालयाचे पत्र क्रमांक १५८०, दिनांक ३१.०७.२००९ अन्वये वनसंरक्षक पुणे यांना सुचना देण्यात आली होती ही वस्तुस्थिती आहे.

अशा परिस्थितीमध्ये वृत्त स्तरावर एकत्रित बिंदु नामावली तयार करुन ही सहाय्यक आयुक्त (मा व क) यांचेकडून तपासून घेणेबाबत कारवाई प्रगतीपथावर आहे. अदयाप निवड झालेल्या क संवर्गातील उमेदवारांना नेमणूक दिलेली नाही.

**<u>उपस्थित मुद्या क्रमांक - ५ :</u>** आपलेकडील दिनांक ३१/७/२००९ चे पत्रान्वये समांतर आरक्षणा अंतर्गत मान्यता प्रदान केलेल्या पदांच्या संख्येत व जाहिरातीतील (दि.१९/९/२००९ चे शुध्दीपत्रकात) नमुद पदाच्या संख्येत तफावत दिसुन येते. सदर तफावतीबाबत आपले खुलासा अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

उपरोक्त नमुद मुद्या हा या कार्यालयाशी निगडीत असल्याने पुढील प्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

समांतर आरक्षणाची होमगार्डची पदे पदभरतीच्या वेळी ५ टक्के प्रमाणे राखीव ठेवावीत असा शासन आदेश झाल्याने एकूण मंजूर पदाच्या ५ टक्के प्रमाणे समांतर आरक्षण दर्शवून मान्यता देण्यात आली होती परंतु वनसंरक्षक, पुणे यांनी सदरचे आरक्षण रिक्त पदाच्या ५ टक्के दर्शविणे आवश्यक असल्याचे या कार्यालयांतील निदर्शनांस आणून त्याप्रमाणे १९/०९/२००९ चे शुध्दिपत्रक काढले आहे. सदर शुध्दिपत्रकांची या कार्यालयाने नोंद घेतल्याचे वनसंरक्षक, पुणे यांना कळविले आहे, त्यामुळे वरील वस्तु:स्थितीमुळे पदांमध्ये फरक दिसत आहे, परंतु सदरचा फरक हा नियमानुसार बरोबर आहे.

**<u>उपस्थित मुद्या क्रमांक - ६ :</u>** लिपीक संवर्गात बैठक क्रमांक २०२३८ व २०२५५ वरील उमेदवारांच्या प्रश्न पत्रिकेवर असलेली पर्यवेक्षकांची स्वाक्षरी जुळुन येत नाही. तसेच बैठक क्रमांक २०२१८ व बैठक क्रमांक २००९० वरील उमेदवारांच्या पर्यवेक्षकांची स्वाक्षरी उमेदवारांच्या प्रश्न पत्रिका व ओएमआर उत्तर पत्रिकेवरील स्वाक्षरी जुळत नसल्याचे दिसुन येते. सदर बाब वनरक्षक संवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत सुध्दा आढळुन येते. याबाबत आपला खुलासा अभिप्रायासह उलट टपाली सादर करावे.

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

**वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :** लिपीक संवर्गातील बैठक क्रमांक २०२३८ व २०२५५ उमेदवारांच्या प्रश्नपत्रिकेवर स्वाक्षरी करणारे संबंधित पर्यवेक्षकांपैकी राहूल काशिद यांचा जबाब नोंदविला असून सदरच्या स्वाक्ष-या त्यांच्याच असल्याचे व गडबडीत सही करतांना फरक पडल्याचे त्यांनी त्यांचे जबाबात म्हंटले आहे. (सहपत्र- ५) (पाने १ ते ५) इतर दोन पर्यवेक्षक १) श्री. निलेश सुर्यवंशी व २) श्री. दे.मा. पवार पुण्याबाहेर असल्याने त्यांची स्वाक्षरीची शहानिशा कार्यालयातील मेहेनताना अदा केल्याचे नोंदवहीवरून व हजेरी पत्रकावरुन केली आहे. त्यात फरक आढळून येत नाही. त्यामुळे सदरचा मुद्या वस्तु:निष्ठ नाही. त्यामुळे खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

सदर बाब वनरक्षक उमेदवाराच्या बाबतीत आढळून आल्याचे नमूद केले आहे. मात्र त्याचे बैठक क्रमांक दिलेले नसल्याने पडताळणी करता येत नाही.

**अभिप्राय -** सदर प्रकरणी असे अभिप्राय देण्यात येत आहेत की, वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी संबधीत पर्यवेक्षांचा समक्ष लेखी जबाब नोंदविला असून सदरील जबाबात संबधीत पर्यवेक्षांनी अनुक्रमांक २०२३८ व २०२५५ उमेदवारांच्या प्रश्नपत्रिकेवर त्यांच्याच स्वाक्ष-या असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे या प्रकरणी आता कोणतीही संधिग्धता राहिली नसल्याने या मुद्यांबाबत हे कार्यालय सहमती दर्शवित आहे. तसेच अनुक्रमांक २००९० व २०२१८ या प्रकरणातील उर्वरीत दोन पर्यवेक्षांच्या स्वाक्षरी प्रकरणी वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांचे कार्यालयाने हजेरी पत्रकावरुन तसेच मेहनताना अदा केलेल्या नोंदवहीवरुन प्रत्यक्षात दस्ताऐवजानुसार शहानिशा केलेली आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता व या प्रकरणी योग्य ती खबरदारी घेऊन वनसंरक्षक पुणे यांनी स्वत: विश्लेषण केले आहे. व या प्रकरणीची तार्कीक (**Logically**) मिमांसेतून हा मुद्या संयुक्तीक ठरत असल्याने उपरोक्त विश्लेषणास सहमती दर्शविण्यात येत आहे. तथापि, याबाबत हस्ताक्षर तज्ञांचा अहवाल घेऊन त्यांनतर या प्रकरणी अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरेल.

**उपस्थित मुद्या क्रमांक - ७ :** गट ड मधील शिपाई संवर्गातील पदांमध्ये बैठक क्रमांक ४०८६३ या उमेदवाराच्या ७ प्रश्नांच्या उत्तरात खोडातोड झालेली असुन त्यात ४ प्रश्नांचे उत्तर बरोबर असुन गुण दिले आहेत तर उर्वरीत ३ प्रश्नांची उत्तरे बरोबर असतांना सुध्दा गुण देण्यांत आलेले नाही.तसेच प्रश्न पत्रिकेवर सुचना क्रमांक ६ मध्ये एकापेक्षा जास्त पर्यायी उत्तरावर खुण केल्यास अथवा खोडतोड केलेली असल्यास त्यात गुण दिले जाणार नाही असे स्पष्ट नमुद असतांना देखील ४ प्रश्नांना गुण देण्यांत आले आहेत तर ३ प्रश्नांना गुण देण्यांत आले नाही असे चौकशी अधिका-यांनी चौकशी अहवालांत नमुद केले आहे.सदर बाब अत्यंत गंभीर असुन संशयास्पद आहे चौकशी अधिकारी यांनी त्यांचे चौकशी अहवालात सदर उमेदवारास ७१ गुण

TRUE COPY
Superintendent to the Chief Conservator of Forest (T) Pune

आहे त्यास ६८ गुण मिळावयास पाहिजे होते असे नमुद केले आहे.परंतु खोडतोड असल्यास त्यात गुण दिले जाणार नाही असे स्पष्ट नमुद आहे.त्यामुळे सदर उमेदवारांचे एकुण ७ गुण कमी करणे क्रमप्राप्त ठरत असुन निवडसुचीत सुध्दा बदल होणेची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत सविस्तर चौकशी करुन आपले खुलासा अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

<u>वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :</u> गट ड शिपाई संवर्गातील ४०८६३ या बैठक क्रमांकाचा उमेदवार निवड यादीतला नाही त्यामुळे खुलासा करता येत नाही. शिपाई संवर्गात लेखी परिक्षेसाठी ४०००१ ते ४२०९७ बैठक क्रमांकाचे उमेदवार शिपाई पदासाठी लेखी परिक्षेत बसले होते. सदर ४०८६३ क्रमांकावरील उमेदवारांची पात्र नसल्यामुळे निवड झालेली नाही.

तथापि चौकशी अधिकारी यांना बैठक क्रमांक ४०६८३ च्या उमेव्दारांच्या पेपर तपासणी करुन त्रुटी उपस्थित केल्या आहेत. सदर उमेद्वारांची उत्तर पत्रिका सोबत जोडली आहे. (सहपत्र-६) पेपर तपासणी अधिका-यांनी उत्तर पत्रिकेवरील मुद्दा क्रमांक ६ नुसार खाडाखोड असल्यास गुण दिले जाणार नाहीत ही सुचना काळजीपुर्वक लक्षात ठेवली नसल्याने खाडाखोड उत्तरास गुणदान केले आहे. त्यामुळे नियमानुसार त्यांची फेर तपासणी करुन निवड सुचित व प्रतिक्षा सूचित आवश्यक तो बदल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तरी खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

<u>अभिप्राय -</u> वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी प्रकरणी झालेली नैसर्गिक मनुष्य स्वभाव दोष त्रुटी मान्य केलेली आहे. तसेच या प्रकरणी नियमानुसार आवश्यक तो बदल करण्याची हमी त्यांचे विश्लेषणात्मक उपरोक्त मुद्यांच्या स्पष्टीकरणामध्ये केलेली आहे. उपलब्ध असलेल्या दस्तऐवजानुसार व घडलेल्या प्रत्यक्ष घटनेची जबाबदारी व त्यातील होणारा बदल हा स्विकृत केला आहे. याबाबत झालेल्या अनियमिततेबाबत संबधीतांवर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच चुकीने नेमणूक दिलेली रद्द ठरविण्यात येईल व संबधीत दोषी व्यक्तीवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

<u>उपस्थित मुद्या क्रमांक - ८ :</u> बैठक क्रमांक ४००४७ वरील उमेदवाराच्या चुकीच्या प्रश्नाला बरोबर असल्याचे दर्शवुन १ गुण जास्तीचा दिलेला आहे असे चौकशी अधिकारी यांनी त्यांचे चौकशी अहवालात नमुद केले आहे. ही सुध्दा एक गंभीर बाब आहे. कारण सदर परिक्षेत एक गुण कमी किंवा जास्त असणे हे उमेदवाराच्या निवडीसाठी महत्वाचे ठरते. त्यामुळे उत्तर पत्रिका तपासण्यात अचुकता नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे याबाबत चौकशी होणे आवश्यक आहे. यावरुन उत्तर पत्रिकेची तपासणी अचुक झालेली नसल्याचे

TRUE COPY
Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

दिसुन येते. त्यामुळे ज्या उमेदवारांचा अंतिम निवड सुचीत समावेश झालेला नाही. याबाबत सविस्तर चौकशी करुन आपले खुलासा अभिप्रायासह-या कार्यालयास सादर करावे.

**वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :** ४००४७ वरील उमेदवाराच्या उत्तरपत्रिका तपासणीमध्ये चुकीच्या उत्तरास एक गुण दिल्याचे दिसुन येते. तथापि तो गुण कमी केल्यास त्या उमेदवाराचे लेखी परिक्षेचे गुण ५२ होतात व त्याला मुलाखतीमध्ये १९.८६ एवढे गुण मिळालेले आहे. म्हणुन त्याची एकुण गुण ७१.८६ एवढे होतात. निवड सुचीतील प्रतिक्षा यादीतील उमेदवारास ७१.२९ एवढे गुण आहे. त्यामुळे ४००४७ या उमेदवाराचे गुण जास्त असल्याने त्याचे निवड सुचीतील स्थान बरोबर आहे त्यामुळे निवड सुचीत बदल होत नाही.संबंधित प्रतिक्षा यादीतील उमेदवाराच्या निवड प्रक्रियेत बाधा आलेली नाही. सोबत बैठक क्रमांक ४००४७ उमेद्वाराची उत्तर पत्रिका अवलोकनार्थ सादर करीत आहे. (सहपत्र-७)तरी खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

**अभिप्राय -** या प्रकरणी वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी संबधीत उमेदवारांच्या तुलनात्मक गुणांक पध्दतीमध्ये १ गुणाचा फरक पडल्याचे मान्य केले आहे. १ गुणाच्या फरकाने सदरील निवड सुचीतील प्रतिक्षा यादीत असलेला उमेदवार हा प्रतिक्षा यादीतच राहत आहे. जो उमेदवार यशस्वीरित्या निवडीस पात्र झालेला आहे त्याच्यावर कोणतीही बाधा आलेली नाही. ही वस्तुस्थिती जरी वनसंरक्षक पुणे यांनी निदर्शनास आणली असली तरी अशा प्रकारे स्पर्धात्मक गुणात्मक पध्दतीत १ मार्काचा फरक पडल्याने उमेदवाराच्या निवड पध्दतीमध्ये फरक पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. किंबुहुना उमेदवारांची गुणवत्ता यादीची महत्वपुर्ण बाब विचारात घेऊन या प्रकरणी नियमानुसार आवश्यक ते गुणांक संबधीत उमेदवारास देऊन योग्य ती चुक सुधारुन संबधीत उमेदवारांची गुणवत्ता आहे तशी दाखविणे संयुक्तीक ठरेल. असे असले तरी अशा चुका अपेक्षित नाहीत. त्यामुळे या प्रकरणी यथायोग्य कार्यवाही करण्यात येईल.

**उपस्थित मुद्या क्रमांक - ९ :** चौकशी अधिकारी यांनी त्यांचे चौकशी अहवालात वनरक्षकांकरिता ५९ पदे भरावयाची असुन ५७ पदांसाठी निवड सुची अंतिमरित्या तयार करण्यांत आली आहे. दिनांक २१/८/२००९ चे जाहिरीतीमध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी आरक्षण नमुद करण्यांत आले आहे. परंतु दि. १९/९/२००९ च्या शुध्दीपत्रकांत प्रकल्पग्रस्तासाठी आरक्षणाचा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्त अंतर्गत निवड झालेल्या एक उमेदवारांची निवड ही दिनांक २१/८/२००९ चे जाहिरातीनुसार करण्यांत आली किंवा कसे? याबाबत आपले खुलासा अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

<u>वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :</u> दिनांक ११/९/२००९ च्या शुध्दीपत्रकांत खुल्या प्रवर्गामध्ये प्रकल्पग्रस्तासाठी आरक्षण दाखविले नाही. तथापि अंतिम सुचीमध्ये प्रकल्पग्रस्त निवडल्याचे दिसते. त्याबाबतचा खुलासा खालील प्रमाणे.

पुर्वीच्या दिनांक २१/८/२००९ चे जाहिरातीमध्ये प्रकल्पग्रस्तासाठी खुल्या प्रवर्गात १ पदाचे आरक्षण दाखविले होते. त्यानुसार या संवर्गात अर्ज प्राप्त झाले आहे. प्रकल्पग्रस्ताची थेट निवड करण्याचे सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक पभप्र/१००८/०७/प्र.क्र.५८/२००८/भाग-२/१६अ, दिनांक १८/७/२००८ (सहपत्र- ८) मध्ये नमूद आहे. तथापि, पुन्हा सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय शाप्रवि/प्रकल्प-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६अ, दिनांक २७/१०/२००९ नुसार प्रकल्पग्रस्ताने सुदधा संधी परिक्षातून सेवा प्रवेश करावा असे निर्देश आल्याने प्रकल्पग्रस्त संवर्गात पात्र ठरलेल्या उमेदवाराची निवड केलेली आहे. तसेच जाहिरातीमध्ये मुददा क्रमांक ४० नुसार पदसंखेत बदल होण्याचे शक्यता आहे असे स्पष्ट नमूद केले आहे. त्याप्रमाणे सुधारित निवड तक्ता आरक्षण व पदसंख्या निहाय तयार केला. सहपत्र- १० त्यामुळे प्रकल्पग्रस्तांचा उमेदवार निवडला आहे व तो योग्य आहे. तरी खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

भरावयाच्या एकूण ५९ पदांपैकी अनुसूचीत जाती प्रवर्गातील प्रकल्पग्रस्त व अनुसूचीत जमातीचा माजी सैनिक या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्याने ही २ पदे भरली नाही. म्हणून वनरक्षक संवर्गात अंतिम निवड यादीत ५७ पदांची भरती करण्यात आलेली आहे. त्यामुळे ५७ उमेदवारांची निवडसूची जाहिर केली आहे.

<u>अभिप्राय -</u> या प्रकरणी वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी त्यांनी त्यांचे वरील विश्लेषणात नमुद केल्याप्रमाणे ५७ पदांसाठीचीच निवडसुची अंतिम रित्या तयार केली आहे. त्यामध्ये दिनांक २१.०८.२००९ चे जाहिरातीनुसार खुला प्रवर्गातील १ प्रकल्पग्रस्ताची निवड करण्यात आली आहे. त्यास जिल्हाधिकारी पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक पमइ/७४९/२, दिनांक १७.०३.२०१० अन्वये मान्यता दिली असून तसे वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक १८.०३.२०१० चे पत्रान्वये या कार्यालयास अवगत केले आहे. सबब ही प्रक्रिया दिनांक २१.०८.२००९ चे जाहिरातीनुसार केल्याचे निदर्शनास येत आहे.

प्रसगत: येथे असे विशेषत्वाने नमुद करण्यात येते की, या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-२-क/आस्था/४४२५, दिनांक २०.०२.२००९ व १५८०, दिनांक ३१.०७.२००९ अन्वये आरक्षित पदे, समांतर आरक्षण पदे इत्यादी माहिती वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांना निर्देशित केली होती. त्यापैकी प्रकल्प ग्रस्तांची पदे जाहिरातीद्वारे न भरता शासन निर्णय दिनांक १८.०७.२००८ प्रमाणे भरावयाची असलेचे वनसंरक्षक पुणे वनविभाग यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक १०२४, दिनांक २२.०६.२००९ अन्वये अलाहिदा

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

कळविले होते. त्यामुळे त्यांनी त्यांचे दिनांक १९.०९.२००९ चे शुध्दी पत्रकात प्रकल्प ग्रस्ताचीपदे दर्शविली नव्हती. परंतू शासनाने त्यांचेकडील दिनांक २७.१०.२००९ चे सुधारीत शासन निर्णयानुसार अशी पदे जाहिरातीशिवाय भरु नयेत असा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतल्यामुळे त्यानुसारच दिनांक २१.०८.२००९ चे जाहितीप्रमाणे प्रकल्पग्रस्त पदे भरण्यात आली. त्यामुळे सदरचे दिनांक २१.०८.२००९ च्या जाहिरातीस जिल्हाधिकारी पुणे यांची मान्यता घेतलेनंतरच तशी मान्यताप्राप्त जाहिरात वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी दैनिक वर्तमानपत्रातून प्रसिध्द् केलेली आहे.

<u>उपस्थित मुद्या क्रमांक - १० :</u> वाहनचालक या संवर्गाची लेखी परिक्षा दिनांक १/११/२००९ रोजी घेण्यात आली व त्याची तपासणीसुध्दा त्याच दिवशी करण्यांत आली. परंतु मौखिक परिक्षा दिनांक ९/२/२०१० रोजी घेण्यांत आली. यावंरुन मौखिक परिक्षा घेण्यास जवळपास ४ महिन्याचा विलंब का करण्यात आला याबाबत वनसंरक्षक पुणे यांचेकडुन खुलासा मागवून आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे. याशिवाय मौखिक परिक्षा दिनांक ९/२/२०१० रोजी घेण्यात आली असतांना उमेदवारांची निवड यादी तयार करण्याकरिता दिनांक ४/३/२०१० रोजी संचालक, महाराष्ट्र तंत्र निकेतन महामंडळ पुणे यांचेकडे फार विलंबाने पाठविण्यांत आली. याबाबत सुध्दा विलंब का करण्यांत आला याबाबत वनसंरक्षक पुणे यांचेकडुन खुलासा मागवून आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

<u>वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :</u> वाहन चालक या संवर्गाची ५० गुणांची लेखी परिक्षा दिनांक १/११/२००९ रोजी सकाळी ११ ते १२:०० या वेळेत आयोजित करण्यांत आली होती व दुपारी १२.०० ते २.०० या वेळेत बौध्दीक शारीरीक व व्यावसायिक चाचणी ५० गुणांची त्याच ठिकाणी घेण्याचे नियोजित करण्यांत आले होते. तथापि कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग दापोडी यांचेकडून तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध न झाल्याने सदरची बौध्दीक व व्यावसायिक चाचणी व मुलाखत स्थगित करण्यांत आली. लेखी परिक्षेचे पेपर तपासणी त्याच दिवशी पुर्ण करुन ते वनसंरक्षक पुणे कार्यालयांत सुरक्षित ठेवण्यांत आले होते. जाहिराती मध्ये नमुद केल्याप्रमाणे लेखी परिक्षा पुर्वनियोजित तारखेस पार पडली व तत्परतेने पेपर तपासणी सुध्दा केली आहे. जाहिरातीमध्ये मुलाखती व निवड यादी प्रसिध्दीची अशी कोणतीही समयसिमा निश्चित केलेली नव्हती. सदर प्रक्रिया दरम्यान या कार्यालयाच्या विविध व प्राधान्य क्रमाचा जबाबदा-या या कार्यालयाकडे सोपविण्यात आल्या. हयाचा तपशिल पुढीलप्रमाणे (१) नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरु झाले ते जवळपास डिसेंबर २००९ पर्यंत चालले. (२) १५ व्या राज्य वनक्रिडा स्पर्धाचे नियोजन याच कार्यालयावर सोपविण्यांत आल्याने माहे डिसेंबर व जानेवारीतील दोन आठवडे या क्रिडा स्पर्धा आयोजनातच

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

अधिकारी /कर्मचारी वर्ग व्यस्त झाला. (३) वनरक्षक,माळी,पहारेकरी व शिपाई या पदाच्या लेखी परिक्षेत पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी दिनांक १२ ते १४ जानेवारी २०१० रोजी बोलविण्यांत आले. व मुलाखतीचा कार्यक्रम पार पडला. (४) वनपाल व वनसर्व्हेक्षक पदाच्या भरती करण्याचे नियोजन मा.मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांचेकडून निर्देश या कार्यालयाला देण्यांत आल्याने ती देखील प्रक्रिया उदा. जाहिरात देणे, धावण्याची चाळणी परिक्षा घेणे, लेखी परिक्षा घेणे हे दिनांक १४ मार्च २०१० पर्यंत सुरु होती. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळाचा वापर याही प्रकरणी करण्यात आला. वाहनचालकांची लेखी परिक्षा व मुलाखतीच्या परिक्षा मान्यता घेण्यासाठी मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-४/आस्था/भरती/१४६८/०९-१०, दिनांक २०/०२/२०१० अन्वये पाठविण्यांत आले आहे. अद्यापही मा.जिल्हाधिकारी, पुणे यांची मान्यता प्रतिक्षित आहे. वरील विदीत कारणांमुळे वाहनचालक या संवर्गाची निवड यादी प्रसिध्द करण्यास अल्प विलंब झालेला आहे त्यामध्ये या कार्यालयाकडून कोणताही कसूर झालेला नाही तरी खुलासा मान्य होणेस विनंती आहे. व तो रास्त आहे असे इकडील मत आहे. (५) वाहन चालक पदाच्या लेखीपरिक्षेत पात्र उमेव्दारांना वाहन चालवणीची चाचणीसाठी तांत्रिक मनुष्यबळ कार्यकारी अभियंता यांचेकडून उपलब्ध होताच दिनांक ९/२/२०१० रोजी शारिरीक, बौध्दिक व मुलाखती व वाहन चालवण्याची चाचणी परिक्षा दापोडी येथे घेतली. गुणवत्तेनुसार निवड यादी व प्रशिक्षा यादी तयार करुन मा. जिल्हाधिकारी पुणे यांना मंजुरीकरीता सादर केले (सहपत्र- ११) ती लवकरच प्राप्त करुन घेत आहोत.

वरील विदीत कारणांमुळे वाहनचालक या संवर्गाची निवड यादी प्रसिध्द करण्यासाठी अल्प विलंब झालेला आहे त्यामध्ये या कार्यालयाकडून कोणताही कसूर झालेला नाही तरी खुलासा मान्य होण्यास विनंती.

अभिप्राय वाहनचालक या संवर्गातील परिक्षा व उमेदवारांची निवड यादी यासाठी झालेल्या विलंबाची जी कारणे वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी त्यांचे विश्लेषण सादर केले आहे. त्यास हे कार्यालय सहमती दर्शवित आहे.

उपस्थित मुद्या क्रमांक - ११ : वाहनचालकांच्या इतर मागास प्रवर्गातील निवड झालेल्या उमेदवारास ७८ गुण मिळाले असुन प्रतिक्षा यादीतील उमेदवारास ७७ गुण मिळाले आहे. परंतु निवड झालेल्या उमेदवारास एक गुण जास्तीचा देण्यात आल्याचा चौकशी अधिकारी यांचे चौकशी अहवालावरुन दिसून येते. परंतु कोणत्या उमेदवाराला एक गुण जास्तीचा देण्यात आला त्या उमेदवाराचे नांव चौकशी अहवालांत नमुद नसल्याने त्याबाबतचा अहवाल खुलाशासह या कार्यालयास सादर करावे. जर सदर १ गुण कमी केल्यास प्रतिक्षा

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

सुचीतील उमेदवार व निवड झालेल्या उमेदवार या दोघांचे सुध्दा समान म्हणजे ७७ गुण होणार आहे. सदर अनियमिततेमुळे निवडसुची पुन्हा तयार करणे आवश्यक वाटते. याबाबत आपले खुलासा अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण : वाहनचालकांच्या संवर्गात इतर मागास प्रवर्गातील उमेदवाराची निवड केलेली नाही. तथापि, सदर निवड करण्यात आलेला उमेदवार विशेष मागास प्रवर्गातील आहे. निवड झालेल्या उमेदवारास ७८ गुण मिळालेले आहेत. सदर उमेदवाराचा बैठक क्रमांक ३०१९७ हा असुन त्याला लेखी परिक्षेत ३८ गुण मिळालेले आहेत. मात्र चौकशी अधिकारी यांनी केलेल्या फेर तपासणीमध्ये त्याला एक गुण जादाचा मिळुन ३९ गुण दिसतात. सदर उमेदवाराची निवड झालेली असल्यामुळे त्याच्या एकूण गुणात एक ने वाढ झाली असुन त्यांचे एकूण गुण ७९ होतील व प्रतिक्षा यादीवरील उमेदवाराचे एकूण गुण हे ७७ असल्याने तो प्रतिक्षा यादीवरच रहाणार आहे. त्यामुळे निवडसुची पुन्हा तयार करण्याची आवश्यकता नाही व वाहनचालक संवर्गात निवड झालेल्या अमेदवारांना जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून अदयाप मान्यता मिळालेली नाही. चौकशी अधिकारी यांनी तपासणी केलेला बैठक क्रमांक ३०१९७ उमेदवाराचा पेपर अवलोकनार्थ सादर केला आहे. (सहपत्र- १२) तरी खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

अभिप्राय - या प्रकरणी वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी केलेला खुलासा व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे अभ्यासता बैठक क्रमांक ३०१९७ हा निवड झालेला उमेदवार असून चौकशी अधिकारी यांच्या फेर तपासणीमध्ये त्याला १ गुण दिल्याने त्याचे गुण ३८ ऐवजी ३९ झाल्याने तोच उमेदवार निवडीस पात्र आहे. त्यामुळे जरी निवड सुची पुन्हा तयार करावी लागली नाही तरी आवश्यक तो वाढीव गुण संबधीतास देऊन सदर चुक सुधारुण संबधीत उमेदवाराची गुणवत्ता आहे तशी वस्तुस्थितीनुरुप दर्शवावी अशा सुचना वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांना देण्यात येत असून त्याप्रमाणे संबधीत उमेदवाराची गुणवत्ता वस्तुस्थितीनुसार सुधारीत करणेत येईल. तसेच अद्याप वाहनचालकाचे संवर्गात निवड झालेल्या यादीस जिल्हाधिकारी पुणे यांचेकडून मान्यता न मिळाल्यामुळे या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-२-क/आस्था/२२/९२६, दिनांक ०४.०६.२०१० अन्वये स्मरणपत्र देण्यात आले असून मान्यता प्राप्त करुन घेण्यासाठी वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे हे कार्यालय प्रयत्नशिल आहे.

उपस्थित मुद्या क्रमांक - १२ : लिपीक संवर्गाची लेखी परिक्षा दिनांक १५/११/२००९ रोजी घेण्यांत आली व लेखी परिक्षा घेण्यांत आलेल्या उमेदवारांच्या उत्तर पत्रिका दिनांक १६/११/२००९ रोजी MKCL यांचेकडे

TRUE COPY
Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

पाठविण्यांत आली. लिपीक संवर्गात मौखिक परिक्षा नसल्याने फक्त लेखी परिक्षेच्या आधारे उमेदवारांची निवड करावयाची होती. लिपीक संवर्गासाठी ३४३ उमेदवारांनी परिक्षा दिलेली असुन उत्तर पत्रिकेची तपासणी संगणकाद्वारे होत असतांना सुध्दा अंतिम निवड यादी जिल्हाधिकारी,पुणे यांचे मान्यतेस दिनांक २०/२/२०१० रोजी पाठविण्यात आली म्हणजेच सदर निवडयादी पाठविण्यास जवळपास ३ महिन्यांचा कालावधी लागलेला आहे. त्यामुळे सदर विलंब का झाला याबाबत वनसंरक्षक, पुणे यांचेकडून खुलासा प्राप्त करुन आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

<u>वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :</u> वनरक्षक व लिपीक संवर्गाची लेखी परिक्षा दिनांक १५/११/२००९ रोजी घेण्यात आली व लेखी परीक्षा घेण्यांत आलेल्या उमेदवाराच्या उत्तरपत्रिका दिनांक १६/११/२००९ रोजी MKCL यांचेकडे संगणकावर तपासण्यासाठी पाठविण्यांत आल्या. सदर उत्तर पत्रिकांची तपासणी संगणकाद्वारे होऊन अंतिम निवड यादी जिल्हाधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी दिनांक २०/०२/२०१० रोजी पाठविण्यांत आली. या विलंबाबाबत असे स्पष्टीकरण देण्यांत येते की, जाहिरातीमध्ये लेखी परिक्षेविषयी पूर्व नियोजित निश्चित वेळापत्रक देण्यात आले होते व त्यानुसारच दिनांक १५/११/२००९ रोजी लेखी परिक्षा घेण्यात आली व सदरील परिक्षा ही पूर्व नियोजित कार्यक्रमानुसारच झालेली आहे. तसेच लेखी परिक्षेचे पेपर सुद्धा तत्परतेने MKCL यांचेकडे पाठविण्यात आले होते.वरीलप्रमाणे नियोजित कार्यक्रम जाहिरातीमध्ये जाहिर करण्यात आल्यानुसार पार पाडण्यात आला.

तथापि, अंतिम निकाल जाहीर करण्याची कोणतीही समय सीमा देण्यांत आलेली नव्हती. वरील मुद्दा क्र.१० मध्ये देण्यांत आलेली १ ते ५ कारणे विचारांत घेता काही अपरिहार्य कारणामुळे अल्प विलंब झाल्याचा दिसुन येतो. तरी खुलासा मान्य होणेस विनंती आहे.

<u>अभिप्राय -</u> प्रस्तुत प्रकरणी झालेला ३ महिन्याचा विलंब हा त्यांच्याकडे असलेल्या कामाच्या व्याप्तीनुसार झालेला आहे. व त्याचे वस्तुस्थिती दर्शक कारण मिमांसा त्यांनी मुद्या क्रमांक १० मध्ये १ ते ५ नुसार विस्तृतपणे केलेली आहे. सबब त्यांचा विलंब हा क्षमापित करणे योग्य ठरेल असे अभिप्राय देण्यात येत आहे.

<u>उपस्थित मुद्या क्रमांक - १३ :</u> वनसंरक्षक, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.कक्ष-४/आस्था/भरती/४३९९, दिनांक ४/३/२०१० अन्वये वाहनचालक या संवर्गात घेण्यांत आलेल्या बौध्दीक व मौखिक चाचणीचा निकाल संचालक, महाराष्ट्र तंत्र निकेतन महामंडळ पुणे यांचेकडे पाठविला असल्याचे दिसुन येते. परंतु सदर निवड सुचीचे अवलोकन केले असता त्यांत जिल्हाधिकारी व इतर सदस्यांनी मौखिक परिक्षेत दिलेले गुण हे ४० गुणांपेक्षा जास्त असल्याचे दिसुन येते. तसेच सरासरी गुण सुध्दा ४० पेक्षा जास्त असल्याचे दिसुन येते.

TRUE COPY

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

तसेच सदर निवड यादीत लेखी परिक्षेच्या गुणांचा सुध्दा तक्ता आहे. परंतु सदर तक्त्यांत लेखी परिक्षेचे गुण नमूद केलेले नाही. सदर तक्त्यांत गुण नमूद करणे आवश्यक असतांना सुध्दा ते नमूद करण्यांत आले नाही. त्यामुळे शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्येक सदस्यांना मौखिक परिक्षेत किती गुणांची मर्यादा आखुन दिलेली आहे याचा उलगडा होत नाही. याबाबत आपले खुलासा या कार्यालयास सादर करावा.

वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण : वाहनचालक संवर्गामध्ये लेखी परिक्षा (जाहिरातीप्रमाणे) ५० गुणांची होती तसेच उर्वरित ५० गुणांचा तपशिल पुढील प्रमाणे शारीरिक-१५, बौध्दीक-२५, मुलाखत-१०, वाहनाची चाचणी असे एकूण अनुक्रमे एकूण ५० गुणांची विभागणी करण्यांत आली होती. त्यानुसार निवड सुचीमध्ये ५० पैकी, जिल्हाधिकारी व इतर ४ सदस्यांनी दिलेले गुण हे ४० व ४० पेक्षा जास्त असल्याचे दिसुन येतात. मौखिक परिक्षेत उपस्थित असलेल्या समिती सदस्यांनी प्रत्येक उमेदवारास ५० पैकी गुण दिले आहे व सर्व सदस्यांनी दिलेल्या गुणांची बेरीज करुन त्याला सदस्यांच्या संख्येने भागुन सरासरी गुण देण्यांत आले आहेत. लेखी परिक्षेच्या गुणांचा तक्ता जोडलेला आहे. परंतु त्यामध्ये लेखी परिक्षेचे गुण नमुद केलेले नाही त्याचे कारण इथे विशेषत्वाने असे नमूद करण्यात येते कि, उमेदवारांची अंतिम निवड ही मुलाखती नंतर होणार असल्याने त्याचे १०० पैकी एकूण गुण विचारांत घेऊन अंतिम निवड यादी तयार करण्यांत आलेली आहे व त्यामध्ये लेखी , बौध्दीक, शारिरीक व वाहनचाचणी इत्यादीचा समावेश असल्याने गुणांची अंतीम निवड सुची तयार करण्यात आली असून अशी निवड यादी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे मान्यतेसाठी सादर केली आहे. त्यास अद्यापही त्यांची मान्यता प्रतिक्षीत आहे.

अभिप्राय - या प्रकरणी वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी जाहिरातीनुसार ५० गुणांची लेखी परिक्षा घेतली आहे. व इतर ५० गुणांमध्ये शाररीक चाचणी ४० व मौखिक मुलाकत १० गुणांची ठेवण्यात आली म्हणजेच एकुण ५० गुणांचा तपशील खालील प्रमाणे नमुद केला आहे. **शाररीक १५ बौध्दीक २५ मौखीक मुलाखत १० एकुण ५० गुणांची** करण्यात आली त्यामुळे मौखिक परिक्षेत दिलेले गुण हे ४० गुणांपेक्षा जास्त आहेत असे नाही या प्रकरणी उपरोक्त बाबी स्पष्ट झाल्या आहेत. सबब या विश्लेषणात्मक मुधाशी सहमती दर्शविण्यात येत आहे.

उपस्थित मुद्या क्रमांक - १४ : आपले कार्यालयाकडून वनरक्षकांकरिता समांतर आरक्षण अंतर्गत महिलांचे १८ पदे दर्शविली असता वनसंरक्षक पुणे यांनी MKCL यांचेकडे सादर केलेल्या अंतिम निवड यादीत तसेच दिनांक १९/९/२००९ च्या शुध्दीपत्रकांत १८ ऐवजी १९ पदे कशी काय दर्शविली आहे, याबाबत वनसंरक्षक पुणे यांचेकडून खुलासा प्राप्त करुन आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

**वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :** मुख्य वनसंरक्षक प्रा. पुणे यांनी त्यांचेकडील दिनांक ३१/७/०९ चे पत्रात वि.जा.अ. च्या २ पदांसाठी समांतर आरक्षण महिला १ व होमगार्ड १ असे दर्शविले होते. होमगार्डचे आरक्षण ५ टक्केप्रमाणे येत नव्हते त्यावेळी सदर आरक्षण एन टी अ जनरल ठेवणेऐवजी चुकीने महिला दर्शविले आहे. त्यामुळे प्रस्तुत महिलांचे आरक्षण १८ ऐवजी १९ झालेले आहे ही वस्तुःस्थिती आहे.

**अभिप्राय -** वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी केलेले विश्लेषण मान्य करता येण्याजोगे नाही याबाबत अद्याप नेमणूका देणेत आलेल्या नसल्याने यामध्ये जरुर तो बदल करणे आवश्यक आहे असे मत आहे. व तसे बदल करण्याचे निर्देश वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांना देण्यात येत आहे.

**उपस्थित मुद्दा क्रमांक - १५ :** वनसंरक्षक, पुणे यांनी त्यांचे पत्र क्र.कक्ष-४/आस्था/भरती/१४६८, दिनांक २०/०२/२०१० अन्वये जिल्हाधिकारी पुणे यांना अंतिम लिपीक व वनरक्षक संवर्गाची अंतिम निवड यादी पाठविली असल्याचे दिसुन येते. दिनांक १९/९/२००९ च्या जाहिरीतीच्या शुध्दीपत्रकात समांतर आरक्षणा अंतर्गत महिलांची एकूण १९ पदे दर्शविली आहेत. परंतु अंतीम निवड यादीत त्यांनी वनरक्षक संवर्गात महिला आरक्षणा अंतर्गत २० पदे दर्शविली आहे. याबाबत वनसंरक्षक पुणे यांचेकडून खुलासा प्राप्त करुन आपले अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावे.

**वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :** वनरक्षक संवर्गात NT (१) मध्ये महिला आरक्षण नव्हते. तथापि गुणवत्तेनुसार सदर महिलेची निवड करण्यांत आलेली आहे. सबब, अंतिम निवड यादीत महिलांची एकूण २० पदे दिसतात. ते योग्य आहेत असे इकडील मत आहे.

**अभिप्राय -** वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांनी केलेले विश्लेषण योग्य असून त्यास हे कार्यालय सहमत आहे.

**उपस्थित मुद्दा क्रमांक - १६ :** जिल्हाधिकारी, पुणे यांनी सुध्दा त्यांचे पत्र क्रमांक पमई/७४९/दोन, दिनांक १७/३/२०१० अन्वये सदर निवड यादीस मान्यता प्रदान केल्याचे दिसुन येते. परंतु त्यात जिल्हाधिकारी पुणे यांनी याबाबत संपुर्ण शहानिशा केला नसल्याचे दिसुन येते. याबाबत आपले खुलासा अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

**वनसंरक्षक पुणे यांनी केलेले मुद्याचे विश्लेषण :** जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष निवड समिती यांनी जाहिरातीचा मसुदा आरक्षणाची पदे याबाबत वेळोवेळी समक्ष कार्यालयांत बोलावून आवश्यक त्या दुरुस्त्या करुन तदनंतर मान्य केला आहे. ही बाब मुद्या क्र.१ च्या स्पष्टिकरणावरुन दिसुन येईल, तसेच भरती प्रक्रियेच्या मुलाखतीच्या वेळी त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते . भरती प्रक्रिया अशा प्रकारे पूर्ण केलेली आहे ही बाब

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune

विचारात घेता जिल्हाधिकारी पुणे यांनी शहानिशा न करता मंजूरी प्रदान केली असे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही.

**अभिप्राय -** जिल्हाधिकारी हे निवड भरती प्रक्रियेत अध्यक्ष होते. यशस्वी उमेदवारांच्या निवड यादीस मान्यता प्रदान करण्याचे पुर्ण अधिकार नियमातील तरतुदीनुसार त्यांना असल्यामुळे या प्रकरणी कोणतेही आक्षेप घेण्याचे अधिकार वा त्यांच्या निर्णयास आक्षेप घेण्याचे अधिकार व कोणतेही लेखी भाष्य करण्याचे अधिकार या कार्यालयास नाहीत. सबब जिल्हाधिकारी पुणे यांनी नियमांच्या तरतुदीनुसार त्यांच्या अधिकारात कार्यवाही केल्याने या प्रकरणी अभिप्राय देण्यास या कार्यालयाने कोणतीही भुमिका घेणे योग्य ठरणार नाही.

सहपत्र - वरीलप्रमाणे.

( ए.एस.के.सिन्हा )
मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे.

प्रतिलीपी - वनसंरक्षक पुणे वनविभाग पुणे यांना माहितीसाठी अग्रेषित.

मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे.

TRUE COPY

Superintendent to the
Chief Conservator of Forest (T) Pune